लोकमत

# 'सिनेट'साठी सोमवारी ३३ केंद्रांवर मतदान

लोकमत न्यूज नेटवर्क,
कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट), विद्या परिषद, अभ्यासमंडळे या अधिकार मंडळासाठी सोमवारी (दि. १४) विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ३३ केंद्रांवर मतदान होणार आहे. या दिवशी विद्यापीठ प्रशासनाने सुटी जाहीर केली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात १२, सांगलीमध्ये १०, तर सातारा जिल्ह्यात ११ मतदान केंद्रे आहेत. यंदा पदवीधर गटातील मतदारांच्या संख्येमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने मतदान केंद्रांची संख्याही वाढविली आहे. पदवीधर गटात ३६ हजार ३४३ आणि शिक्षक गटासाठी ६४० इतके मतदार हे पात्र ठरले आहेत.

दरम्यान, शिक्षक, प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, शिक्षकेतर कर्मचारी यांना मतदान करावे लागणार आहे. ते लक्षात घेऊन विद्यापीठ प्रशासनाने मतदानादिवशी सर्व संलग्नित महाविद्यालये, शिक्षण संस्था, विद्यापीठातील पदव्युत्तर अधिविभागांना सुटी जाहीर केली आहे, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. या निवडणूकीकडे सर्वांचे लक्ष आहे.

सकाळ



कोल्हापूर : जिल्हाधिकारी कार्यालय व शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने काढण्यात आलेल्या मतदार जागृती सायकल रॅलीला हिरवा झेंडा दाखवताना भगवान कांबळे, डॉ. एम. एस. देशमुख व अन्य.

# सायकल रॅलीतून मतदार जागृती

कोल्हापूर, ता. ९ : मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने काढण्यात आलेल्या सायकल रॅलीतून मतदार जागृतीचा संदेश देण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाचे अधिष्ठाता (सामाजिक शास्त्र) डॉ. एम. एस. देशमुख व उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारत येथून सायकल रॅलीची सुरुवात करण्यात आली. या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये, लोकशाही सुशासन आणि निवडणूक विभागाचे विद्यापीठ समन्वयक प्रा. डॉ. प्रल्हाद माने उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठ बहिस्थ शिक्षण इमारतीपासून सुरुवात ते सायबर चौक ते माऊली चौक, नंतर सम्राटनगर, त्यानंतर एनसीसी भवन शिवाजी विद्यापीठ प्रवेशद्वारामार्गे शिवाजी विद्यापीठाच्या जिजामाता सभागृहाजवळ सांगता करण्यात आली. रॅलीत सहभागी नागरिकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

10 NOV 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्वानांनी अत्याधुनिक साधने स्थापित करावी

**▪ भोपाळ इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसोर्सचे संचालक प्रा. सिवा उमापती यांची अपेक्षा**

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. सी. व्ही. रमण यांनी प्रतिकूल परिस्थितीत रमन इफेक्ट हा महत्त्वाचा शोध लावला. म्हणून आपण तांत्रिकदृष्ट्या संशोधन करण्यास सक्षम आहोत. म्हणूनच विद्वानांनी वैज्ञानिक समुदायासाठी अत्याधुनिक साधने स्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अशी अपेक्षा भोपाळ इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसोर्सचे संचालक प्रा. सिवा उमापती यांनी व्यक्त केली.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग प्रायोजित शिवाजी विद्यापीठातील स्तुती कार्यक्रमात डॉ. सी. व्ही. रमण यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. याप्रसंगी प्रा. सिवा उमापती ऑनलाईन या कार्यक्रमात सहभागी झाले होते. याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. सहभागी वक्ते, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी आयोजित केलेल्या स्तुती कार्यक्रमाचे कौतुक केले.




**कोल्हापूर : विद्यापीठातील स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमांमधील सहभागी विद्यार्थी, प्राध्यापकांसह सर्व मान्यवर**

स्टार्टअप इंडिया आणि स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवा अंतर्गत देशातील वेगवेगळया नामांकित संस्थेतून आलेल्या संशोधकांना या विभागामधील अत्याधुनिक उपकरणांची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. सात दिवस देशातील नामवंत प्राध्यापक, वैज्ञानिकांनी मार्गदर्शन केले. रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डी. एस. भांगे यांनी 'एक्सरे डीफ्रॅक्शन" उपकरणाची माहिती दिली. बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स पिलानी, गोवा कॅम्पसचे प्रा. सुनील भांड यांनी 'अॅटॉमिक फोर्स मायक्रोस्कोपी" या उपकरणाची माहिती दिली. श्रीनगर, दिल्ली, बंगलोर, गोवा, मुंबई, पुणे आदी भागातील १४ तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. स्तुती कार्यक्रम पार पाडण्यासाठी डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. के. डी. पवार, डॉ. मकसूद वाईकर, आदिती गर्गे, अजित कांबळे, विजया इंगळे, सुप्रिया साठे, गायत्री पवार यांनी सहकार्य केले.

तरूण भारत



कोल्हापूर : मतदार जनजागृतीसाठी बुधवारी शिवाजी विद्यापीठ येथे सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

# मतदार जनजागृतीसाठी सायकल रॅली

कोल्हापूर : मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी शिवाजी विद्यापीठ व आसपासच्या परिसरात मतदार जनजागृतीसाठी सायकल रॅली काढण्यात आली. शिवाजी विद्यापीठ येथे उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे व शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक शास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या रॅलीची सुरुवात झाली. यावेळी सहभागी सायकलस्वार विद्यार्थी व नागरिकांनी मतदार जागृतीपर संदेशाच्या बॅजेस लावल्या होत्या. ही रॅली शिवाजी विद्यापीठाचा बहिस्थ शिक्षण विभाग, सायबर चौक, माऊली चौक–राजारामपुरी, सम्राटनगर, एन.सी.सी. भवनमार्गे शिवाजी विद्यापीठाचे प्रवेशद्वार येथे येऊन समाप्त झाली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये, लोकशाही सुशासन आणि निवडणूक विभागाचे विद्यापीठ समन्वयक प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांच्यासह विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.